महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २७८ वे दिनांक : ०४/१०/२०२६ वार : रविवार

## 'पदावर असताना चौकशी कशी होणार?' सतेज पाटलांचा सरकारला सवाल



**कोल्हापुर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) कारभारावरून सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. MPSC च्या पदाधिकाऱ्यांची चौकशी करायची असेल, तर संबंधित व्यक्ती पदावर असताना ती निष्पक्षपणे कशी होणार, असा सवाल त्यांनी केला. 'पदावर असताना चौकशी कशी होणार? त्यांची कुठेतरी बदली करा आणि मग न्यायालयीन चौकशी करा. त्यातून दूध का दूध, पाणी का पाणी होईल,' अशी भूमिका सतेज पाटील यांनी मांडली. MPSCच्या विविध परीक्षांमध्ये कथित गैरप्रकार, पेपरफुटीचे आरोप, परीक्षा पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींवरून गेल्या काही दिवसांपासून पुण्यात आंदोलन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि MPSC विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली होती. त्यानंतर सरकारकडून आयोगाच्या कारभाराबाबत न्यायालयीन चौकशी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तसेच MPSCचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या बदलीचेही आश्वासन देण्यात आले होते. सतेज पाटील यांनी MPSC आंदोलनावर भाष्य करताना CBT पद्धती, विविध परीक्षांमधील कथित गैरप्रकार आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा उल्लेख केला. मुख्यमंत्री स्वतः न्यायालयीन चौकशीचे आश्वासन देत असतील, तर या प्रकरणाची गंभीर दखल घेतली गेल्याचे दिसते, असे ते म्हणाले. 'ते त्या पोस्टवर असल्यावर चौकशी कशी होणार? तुम्ही त्यांची ट्रान्सफर कुठंतरी करा आणि मग न्यायालयीन चौकशी करा. त्यातून दूध का दूध, पाणी का पाणी होईल,' असे सतेज पाटील यांनी म्हटले. चौकशी पूर्ण झाल्यानंतर या प्रकरणातील वस्तुस्थिती MPSCच्या विद्यार्थ्यांसमोर येईल, असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे केवळ आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कारवाई होणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी मांडली. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत सतेज पाटील यांनी सरकारवर आंदोलनात फूट पाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही केला. आंदोलन सुरू असताना त्याच मुद्द्यांवर वेगळे आंदोलन उभे करण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा त्यांनी केला. लोकशाही व्यवस्थेत एखाद्या आंदोलनातील मुद्दा योग्य वाटत असेल, तर सत्ताधारी पक्षातील व्यक्तीलाही त्या आंदोलनाला पाठिंबा देता येतो. मात्र, आंदोलनात फूट पाडून वेगळे आंदोलन उभे करणे योग्य नसल्याचे पाटील यांनी म्हटले. दरम्यान, पुण्यात MPSCच्या प्रश्नांवर एकाच काळात दोन वेगवेगळी आंदोलने सुरू झाल्याचे समोर आले. एका आंदोलनात MPSC अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली, तर दुसऱ्या आंदोलनात परीक्षेच्या पद्धतीशी संबंधित मागण्या करण्यात आल्या. MPSC विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा कायम असल्याचेही सतेज पाटील यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर केवळ शिष्टमंडळाशी चर्चा करून थांबण्याऐवजी सरकारने प्रत्यक्ष निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. 'MPSCचे विद्यार्थी-विद्यार्थिनी याला बळी पडणार नाहीत आणि जो मुद्दा आहे, त्या मुद्द्याला धरून जे आंदोलन चाललंय, त्याला काँग्रेस पक्षाचा तर पाठिंबा सातत्याने राहिलेलाच आहे,' असे पाटील म्हणाले.

## ग्रामसभेतील प्रश्नावरून वाद; तरुणाला मारहाण केल्याचा आरोप



**जळगाव :** ग्रामसभेत गावातील समस्यांबाबत प्रश्न विचारणे एका तरुणाला चांगलेच महागात पडल्याची घटना जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात समोर आली आहे. जारगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत धूर फवारणी यंत्राच्या वापराबाबत तरुणाने प्रश्न उपस्थित केला. यावरून तरुण आणि माजी सरपंच यांच्यात वाद झाला. हा वाद वाढल्यानंतर तरुणाला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. जारगाव ग्रामपंचायतीची ग्रामसभा सुरू असताना गावातील नागरिक विविध विषयांवर प्रश्न उपस्थित करत होते. त्याचवेळी एका तरुणाने ग्रामपंचायतीच्या धूर फवारणी यंत्राच्या वापराबाबत माहिती विचारली. यंत्राचा वापर कसा केला जातो, त्याचा गावकऱ्यांना नेमका काय फायदा झाला आणि त्यासंदर्भातील कामकाजाबाबत तरुणाने प्रश्न उपस्थित केल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रश्नावरून ग्रामसभेतच वातावरण तापले. संबंधित तरुण आणि माजी सरपंच यांच्यात आधी शाब्दिक वाद झाला. दोघांमध्ये काही वेळ बाचाबाची झाल्यानंतर परिस्थिती आणखी चिघळल्याचा आरोप आहे. त्यानंतर माजी सरपंचाने तरुणाला मारहाण केल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. ग्रामसभेत उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ मोबाईलमध्ये रेकॉर्ड केला. या व्हिडिओमध्ये ग्रामसभेच्या ठिकाणी झालेला वाद आणि त्यानंतरची परिस्थिती दिसत असल्याचे सांगण्यात येत आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पाचोरा तालुक्यात या घटनेची चर्चा सुरू झाली आहे. ग्रामसभा ही गावातील नागरिकांना त्यांच्या प्रश्नांवर प्रशासनासमोर भूमिका मांडण्यासाठी महत्त्वाची जागा मानली जाते. अशा बैठकीत नागरिकांनी गावातील कामे, निधीचा वापर आणि विविध सुविधांबाबत प्रश्न विचारणे अपेक्षित असते. मात्र, प्रश्न विचारण्यावरून वाद होऊन प्रकरण मारहाणीच्या आरोपापर्यंत पोहोचल्याने या घटनेची चर्चा होत आहे. मारहाणीच्या घटनेनंतर संबंधित तरुणाने पाचोरा पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणात माजी सरपंचासह एकूण तिघांविरोधात लेखी तक्रार देण्यात आल्याची माहिती आहे. तक्रारीत मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणात नेमका वाद कशामुळे सुरू झाला, ग्रामसभेत तरुणाने कोणता प्रश्न विचारला होता आणि त्यानंतर मारहाणीची घटना नेमकी कशी घडली, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. तक्रारदाराचे आरोप, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि सोशल मीडियावर व्हायरल झालेला व्हिडिओ या सर्व बाबी तपासल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. या घटनेमुळे जारगाव ग्रामपंचायतीच्या कारभारावरही चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या प्रकरणातील आरोपांची अधिकृत पडताळणी आणि पोलिसांचा तपास पूर्ण झाल्यानंतरच घटनेचे नेमके चित्र स्पष्ट होईल .

## शिवाजी पार्कमध्ये सीजेपीचे विनापरवानगी आंदोलन

**मुंबई :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने मुंबईतील शिवाजी पार्क मैदानात आज मोठे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात देशभरातून आलेल्या 'जेन झी' तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सीजेपीने या आंदोलनाचा इशारा आधीच दिला होता, मात्र पोलिसांनी या आंदोलनाला अधिकृत परवानगी नाकारली होती. तरीही हे आंदोलन पार पडल्याने आता नव्या वादाला तोंड फुटले आहे. परवानगी नसतानाही आंदोलन केल्यामुळे अभिजीत दिपके आणि त्यांच्या टीमच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. याप्रकरणी मुंबईच्या शिवाजी पार्क पोलिस ठाण्यात अभिजीत दिपके, सौरभ दास, आशुतोष रांका आणि रत्ना सिंह यांच्या विरोधात एका व्यक्तीने तक्रार दाखल केली आहे. विनापरवानगी गर्दी जमवणे आणि बॉम्बे हायकोर्टाने जनहित याचिका (PIL) ११६/२००९ नुसार ४ जानेवारी २०१३ रोजी दिलेल्या निकालाचे, तसेच राज्य सरकारच्या निर्बंधांचे उल्लंघन केल्याचा दावा या तक्रारीत करण्यात आला आहे. या आंदोलनाला शांततापूर्ण मार्गाने झालेले आंदोलन म्हणता येणार नाही, कारण आंदोलनाच्या नावाखाली थेट सरकारी आदेशांचे उल्लंघन करण्यात आले आहे. ज्या लोकांनी या आंदोलनादरम्यान संविधानाच्या रक्षणाचा मोठा दावा केला, त्याच लोकांनी प्रत्यक्षात कायद्याचे आणि नियमांचे उल्लंघन केले आहे, असा गंभीर आरोप दाखल करण्यात आलेल्या तक्रारीमध्ये करण्यात आला आहे. मुंबईत विनापरवानगी पार पडलेल्या या आंदोलनामागे सीजेपीच्या प्रामुख्याने तीन मागण्या होत्या. यामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, एसआयआर (SIR) प्रक्रिया संपूर्णपणे रद्द करण्यात यावी आणि २०२९ च्या निवडणुका या २०२५ च्या मतदार यादीनुसारच घेण्यात याव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी आजचे हे आंदोलन पुकारण्यात आले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०४ ऑक्टोबर २०२६

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६: बीड जिल्ह्यात २२,७२८ शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची माहिती पोर्टलवर अपलोड

**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' अंतर्गत बीड जिल्ह्यातील अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. ही योजना शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२६ रोजी जाहीर करण्यात आली असून, या योजनेतील काही निकषांमध्ये दिनांक १५/०७/२०२६ नुसार अंशता बदल करण्यात आला आहे. या योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समझोता (OTS) या घटकाच्या अंमलबजावणीसाठी बीड जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँक व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांनी २२,७२८ शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची माहिती महाआयटी मार्फत विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली आहे.आधार प्रमाणीकरणाच्या सद्यस्थितीनुसार, पात्र ठरलेल्या थकीत शेतकऱ्यांपैकी १४,८८१२ शेतकऱ्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी २ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १२,२६८६ शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून अद्याप २६,१२६ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण प्रलंबित आहे. ज्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे, त्यांनी त्वरीत जवळील 'आपले सरकार सेवा केंद्रावर' जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे, कारण आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतरच लाभ रक्कम थेट कर्जखात्यामध्ये वितरित केली जाईल.वितरित करण्यात आलेल्या मदतीच्या अनुषंगाने, मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या शुभहस्ते दिनांक १/१०/२०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमात बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ५४२ कर्जदार शेतकऱ्यांच्या खात्यावर २.९२ कोटी रुपये जमा झाले आहेत. राष्ट्रीयकृत बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ४,३१७० शेतकऱ्यांच्या खात्यावर ४२१.६५ कोटी रुपये जमा झाले आहेत. एकूण बीड जिल्ह्यातील ४,३७१२ शेतकऱ्यांच्या खात्यावर ४२४.५७ कोटी रुपये नवीन जमा झाले आहेत. आतापर्यंत तिन्ही हफ्ते मिळून बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँक व ग्रामीण बँकेच्या १०४६२४ पीक कर्ज थकीत शेतकऱ्यांच्या खात्यावर ८८५.०७ कोटी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पीक कर्ज थकीत ६२५४ शेतकऱ्यांच्या खात्यावर ३३.४९ कोटी रक्कम जमा झालेली आहे. अशा प्रकारे बीड जिल्ह्यातील एकूण ११०८७८ थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर ९१८.५६ कोटी रुपये दिनांक २ ऑक्टोबर २०२६ (तीन हफ्ते मिळून) पर्यंत जमा झाले आहेत.योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना तातडीने पीक कर्ज वाटप करण्याबाबत सर्व बँकांना शासनामार्फत निर्देश देण्यात आले आहेत. सदर माहिती मा. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी, बीड व श्री. सतीश तोटावार, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध करण्यात आली आहे

## जेईएस महाविद्यालय मध्ये कंपाउंड राउंड राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धा सातारा येथील नेत्रा सहारे प्रथम



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जेईएस महाविद्यालय जालना येथे राज्यस्तरीय "कंपाउंड राउंड" महाराष्ट्र राज्य वरिष्ठ धनुर्विद्या स्पर्धेचा आजचा दुसरा दिवस होता.स्पर्धेत आंतरराष्ट्रीय धनुर्धर सहभागी झाले असून भीष्म आर्चरी असोसीएशन तसेच गुरु द्रोणा आर्चरी अकॅडमी, जालना फर्स्ट सिटीझन फोरम व रोटरी क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रशांत देशपांडे, महासचिव श्री.प्रमोद चांदुरकर यांचे नेतृव व मार्गदर्शन लाभले.दुसऱ्या दिवशी विविध जिल्ह्यांमधून आलेल्या 132 मुले व 96 मुलींनी सहभाग नोंदवला. एकूण 228 धनुर्विद्या खेळाडू कंपाउंड राउंड फेरीत सहभागी झाले. टॉप 32 महिला खेळाडूंपैकी मुलिंच्या गटात सातारा येथील नेत्रा सहारे हिने 702 गुण घेऊन राज्यातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. अमरावती ची मधुरा धामणगावकर 698 गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला.सोलापूर येथील वैष्णवी पाटील हिने 696 अंक घेऊन तृतीय क्रमांक मिळवला तर बुलढाणा येथील श्रुष्टि बोरसे 695 गुण संपादन करून चौथे स्थान मिळवले तसेच पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड महानगरातील वैदही जाधव हिला 994 गुण मिळाले व तिचा पाचवा क्रमांक आला. साताऱ्याची आदिती स्वामी हिने 693 गुण संपादित करून राज्यस्तरीय स्पर्धेत सहावे येण्याची उत्कृष्ट कामगिरी केली.सायंकाळी बातमी हाती येईपर्यंत मुलांच्या स्पर्धेचा निकाल घोषित करणे असे क्रीडा संचालक प्रा. डॉ. हेमंत वर्मा यांनी सांगितले. आज स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री,धनुर्विद्या संघटनेचे राज्य सचिव श्री प्रकाश दुसेजा, श्री सचिन टेकुर, प्रा डॉ राजेंद्र सोनवणे, क्रीडा शिक्षक श्री.राहुल सारस्वत, प्रा. किशोर बिरकायलू, सर्व प्रशिक्षक राज्य धनुर्विद्या संघटनेचे पदाधिकारी आदींनी विशेष परिश्रम घेतलेत.

## जिंतूर तालुक्यात कोठा येथील पाच वर्षांतील विकासकामांची चौकशी करण्याची मागणी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील कोठा (बेलूरा) ग्रामपंचायतीअंतर्गत मागील पाच वर्षांत करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा दर्जा, प्रत्यक्ष कामाचे प्रमाण आणि त्यासाठी झालेल्या खर्चाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थ मारोती गणपत चव्हाण यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असल्याचे म्हटले आहे. तक्रारीवर अपेक्षित कार्यवाही न झाल्याचा दावा करत चव्हाण यांनी दोन ऑक्टोबरपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.चव्हाण यांच्या निवेदनानुसार, ग्रामपंचायतीअंतर्गत झालेल्या विकासकामांची मंजूर अंदाजपत्रके, आराखडे आणि तांत्रिक निकषांनुसार अंमलबजावणी झाली आहे का, कामाचे प्रत्यक्ष प्रमाण आणि खर्चाच्या नोंदी यामध्ये तफावत आहे का, याची अधिकृत यंत्रणेमार्फत तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित कामांची प्रत्यक्ष पाहणी करून अभिलेखांशी पडताळणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.ग्रामसभा प्रक्रियेबाबतही निवेदनात गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. गावात नियमानुसार ग्रामसभा झालेली नसतानाही ग्रामसभा झाल्याचे दाखविण्यात आल्याचा दावा तक्रारदाराने केला असून, त्यासाठी दुसऱ्या गावातील ग्रामसभेची छायाचित्रे जोडण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्याचे म्हटले आहे. हा दावा तपासातून सत्य ठरल्यास संबंधित अभिलेखांची पडताळणी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर संबंधित पाच वर्षांतील ग्रामसभा इतिवृत्त, उपस्थिती नोंदवही, ठराव पुस्तिका, छायाचित्रे आणि इतर अधिकृत अभिलेखांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामसभा प्रत्यक्षात झाली होती की नाही, याची स्वतंत्रपणे खातरजमा करून त्याबाबतचा चौकशी अहवाल सादर करावा, असेही निवेदनात नमुद आहे.दरम्यान, 2 ऑक्टोबरपर्यंत ठोस कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा चव्हाण यांनी दिला होता. त्यानुसार ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे. विकासकामांचा दर्जा, निधीचा वापर आणि ग्रामसभा प्रक्रियेबाबत करण्यात आलेल्या तक्रारींची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच आरोपांमधील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासन या प्रकरणाची दखल घेऊन कोणती कार्यवाही करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०४ ऑक्टोबर २०२६


## भूकंपाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी घेतली माहिती

**हिंगोली/बीड (भगवंत पाळवदे) :** हिंगोली जिल्ह्यात आज सकाळी भूकंपाचे दोन धक्के जाणवले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्ह्यातील परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली असून, जिल्हा प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे परिसरात सकाळी ९.४३ वाजता ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. या भूकंपाचे धक्के हिंगोली शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत जाणवले. त्यापूर्वी औंढा नागनाथ तालुक्यातील गढाळा परिसरात सकाळी ७.४६ वाजता भूगर्भातून आवाजासह सौम्य धक्का जाणवला. या धक्क्याची नोंद ३.३ रिश्टर स्केल इतकी झाली.प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही भूकंपाच्या धक्क्यांमुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, आवश्यक त्या ठिकाणी पाहणी व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात येत आहे.नागरिकांनी घाबरून जाऊ नये. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अधिकृत माहितीसाठी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे

## अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त काव्यवाचन



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील बलसूर येथे श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालयात शनिवारी (ता.तीन) रोजी अभिजात मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने काव्यवाचन घेण्यात आले. यावेळी अनेक विद्यार्थी विद्यार्थीनींनी मराठी भाषेवरील आपल्या कविता सादर केल्या.आपल्या भाषणात मराठी विभागप्रमुख प्रा.परमेश्वर सूर्यवंशी यांनी अभिजात मराठी भाषेसंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती सांगत ,मराठी भाषेची पूर्वपरंपरा प्रतिपादन केले.मराठी भाषा जिवंत आणि प्रवाही ठेवण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करून ,तिच्या संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे म्हणाले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सतीश वाकडे होते. प्रा. परमेश्वर सूर्यवंशी , प्रा.एन.टी.तेलंग, बी.टी.जाधव, के .डी. कांबळे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. अनुक्रमे प्रा. सूर्यवंशी आणि प्रा. तेलंग यांची समयोचीत भाषणे झाली. संजीवनी मुगळे, श्रेया बोंडगे यांच्या कविता विशेष गाजल्या.या काव्यवाचन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती औसेकर यांनी तर आभार प्रा. .बी.टी.जाधव यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## मुरुम येथे रोटरी क्लबच्या वतीने नेशन बिल्डर अवार्ड, गणेश मंडळ पुरस्कार व सायकलचे वितरण



***फोटो ओळ :*** *मुरूम, ता. उमरगा येथील प्रतिभा निकेतन विद्यालयात आयोजित रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने गरजू विद्यार्थिनींना सायकलचे वाटप शरण पाटील, संजय पंचगल्ले, ज्ञानेश्वर गव्हाणे यांच्या हस्ते करताना मान्यवर व अन्य*

**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** रोटरी क्लब मुरुम सिटीच्या वतीने मुरुम येथील प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (ता. ३) 'नेशन बिल्डर अवॉर्ड', उत्कृष्ट गणेश मंडळ पुरस्कार आणि गरजू विद्यार्थीनींना सायकल वाटप सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेतरस्ते योजनेचे सहअध्यक्ष शरण पाटील या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. यावेळी लातूर येथील विभागीय शिक्षण मंडळाचे सहाय्यक उपसंचालक संजय पंचगल्ले, मुरूम पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर गव्हाणे, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, रोटरीचे अध्यक्ष कल्लय्या स्वामी, मुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, सचिव प्रकाश रोडगे, सहशिक्षक संदीप रोकडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि कुंडीतील रोपट्याला पाणी देऊन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.या सोहळ्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींमध्ये रोटरी आत्मनिर्भर पुरस्कार २०२५ गुंडू पुराणे (व्यावसायिक), रोटरी सक्षम पुरस्कार (दिव्यांग कार्य) सहदेव बोडरे, नेशन बिल्डर अवार्ड - २०२६ (आदर्श शिक्षक) काशिनाथ सातलगावकर (नाईक नगर), महादेव गायकवाड (भोसगा), सोनाली कलशेट्टी (मुरूम), श्रीकांत कनकधर (वरनाळवाडी), सोमनाथ चीनगुंडे (करवंजी), विनोद भोजने (बोळेगाव), गुंडू पवार (दाळिंब), सतीश जाधव (अचलेर), उमाकांत महामुनी (मुरूम), प्रा. डॉ. अप्पासाहेब सूर्यवंशी (मुरूम), गणेशोत्सवादरम्यान सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवणाऱ्या मंडळांमध्ये मुरूम येथील किसान गणेश मंडळ (प्रथम), यशवंत गणेश मंडळ (द्वितीय), शंकर गणेश मंडळ (तृतीय) तर शिक्षणात आणि प्रवासात अडथळा येऊ नये, यासाठी रोटरी क्लबच्या वतीने गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले. यामध्ये आदिती उजने (बेनीतुरा, इयत्ता ५ वी), वैष्णवी जाधव (काटेवाडी, इयत्ता ५ वी), मोहिनी गायकवाड (भुयार चिंचोली, इयत्ता ७ वी), सुवानी अचलेरे (कंटेकुर, इयत्ता ६ वी), पायल चिंचोळे (बेळंब, इयत्ता ६ वी) या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते सायकली वितरित करण्यात आल्या. यावेळी पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर गव्हाणे व सहशिक्षक श्रीकांत कनकधर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. चौकट : शिक्षकांचा सन्मान गौरवाची बाब...संजय पंचगल्लेसहाय्यक उपसंचालक संजय पंचगल्ले म्हणाले की, समाजसेवेचे व्रत घेतलेल्या शिक्षकांचा रोटरीच्या वतीने सन्मान होणे ही अत्यंत गौरवाची बाब आहे. शिक्षकांनी आपले व्रत पवित्र भावनेने जोपासून समाजसेवा केली पाहिजे. सेवा हेच कर्म मानून सामाजिक बांधिलकीच्या भावनेने सातत्याने उपक्रम राबवले पाहिजेत.शरण फाऊंडेशन नेहमीच मदत करेल... शरण पाटीलअध्यक्षीय समारोप करताना शरण पाटील यांनी सांगितले की, जागतिक पातळीवर काम करणारी रोटरी इंटरनॅशनल ही निष्काम सेवाभावी संस्था म्हणून जगभर परिचित आहे. या संस्थेला शरण पाटील फाऊंडेशन नेहमीच मदत करत राहील. मानव सेवेचे व्रत घेऊनच पुढील काळातही कार्य केले जाईल.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्लय्या स्वामी यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी गोविंद पाटील, डॉ. नितीन डागा, प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. त्रिंबक व्हटकर, सुनील राठोड, प्रा. भूषण पाताळे, मल्लिकार्जुन बदोले, कल्लाप्पा पाटील, बाबासाहेब पाटील, शिवशरण वरनाळे, ॲड. अमर पवार, शिवानंद स्वामी, शिवानंद पाटील, शरणाप्पा धुम्मा आदींनी विशेष पुढाकार घेतला.सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी तर आभार उल्हास घुरघुरे यांनी मानले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक, शिक्षण प्रेमी, गणेश मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०४ ऑक्टोबर २०२६


# ४.आणि राजप्रासादात पाऊल टाकले




त्यादिवशी समीरने सारसनगरमध्ये जास्त वेळ विक्री केली नाही. तो लगेच भाग्यनगरास परतला. त्वरीत कारागीराकडे गेला. त्याने त्या कारागीराला सांगितले की मला सारसनगरच्या राजकुमारीसाठी बांगड्या बनवायच्या आहेत, त्यामुळे उत्तमोत्तम बांगड्या मला बनवून दे. त्याप्रमाणे त्या कारागीराने आपले सर्व कौशल्य पणाला लावून, हस्तीदंताच्या, चन्दनाच्या लाकडाच्या, सोन्याच्या, चांदीच्या, काचेच्या, हिरे, माणिक, मोती लावलेल्या अशा वेगवेगळ्या प्रकारच्या अत्यंत सुबक, आकर्षक व आधी कधीही न वापरलेल्या नक्षीच्या बांगड्या प्रत्येकी एक एक डझन बनविल्या. समीरही बांगड्या कश्या बनविल्या जात आहेत याकडे जातीने लक्ष देत होता. बघता बघता आठवडा कसा सरला हे कळलेच नाही आणि सारसनगरला जाण्याचा दिवस उजाडला. समीरने सुर्योदयापुर्वी एक प्रहर आधी भाग्यनगर सोडले आणि बरोबर वेळेत म्हणजे सुर्योदयानन्तर एक प्रहराने तो रजनीच्या वाड्यावर पोहोचला. द्वारपालाने त्याला जोत्यावर बसायला सांगितले. रजनीला आत निरोप पाठविला. रजनीही तयार होती. दोघेही राजवाड्याकडे निघाले.

रजनीचा मेणा पुढे आणि हा मागे चालत होता. सकाळची थण्ड हवा वहात होती. कोणी मन्दिराकडे पुजेचे ताट घेऊन निघाले होते तर कोणी घोड्यारवरून कामावर निघाले होते. समीर झपझप पावले पुढे टाकत होता. थोड्याच वेळात ते त्या प्रसादाजवळ आले.

राजवाड्याच्या प्रवेशद्वारातील दिण्डी दरवाजातून रजनीचा मेणा पटकन आत गेला, हा समीर जसा आत घुसायला लागला तसा द्वारपालाने लगेचच त्याला अडवीले "अरे तु आत कशाला चालला ? काय काम आहे ?" द्वारपालाचे हे शब्द रजनीच्या कानी पडताच तिने लगेच मेण्याचा पडदा बाजूला सारून मागे वळून बघत द्वारपालाला सांगितले, "अरे तो माझ्या बरोबर आहे. येऊ दे त्याला आत..." मग द्वारपालाने त्याला आत सोडले. आत प्रवेश करताच त्याला समोर दिसले ते एक भला मोठा गोलाकार हौद, त्या हौदात कितीतरी कमळे फुललेली होती. तसेच बदकेही विहार करत होती. रजनी उजव्या बाजूला वळून पुढे पुढे जात होती, समीर तिच्या मागे मागे जात होता, डोळे विस्फारून आजूबाजूला पहात होता. हा राजप्रासाद म्हणजे जणू काही एक नगरच आहे असे त्याला वाटले. एक एक भव्य इमारती दिसत होत्या, त्या भव्य इमारतींमध्ये कितीतरी दालने होती. इमारतींबाहेर हत्ती झुलत होते, तर घोडे खिंकाळत होते. बरीच माणसे इकडून-तिकडे लगबगीने जात होती. कोणी पालखीतून, तर कोणी मेण्यातून जात होते. कोणाबरोबर अंगरक्षक होते. एवढ्यात त्याला मोठा घण्टा नाद ऐकू आला. "सूर्योदयापासून सकाळचे दोन प्रहर" असा पुकारा त्या घण्टा वाजविणाऱ्याने दिला. वाटेत त्याला काही बागा दिसल्या, काही लहान मोठी वृक्षे दिसली.

रजनी एका इमारतीत शिरली. पाठोपाठ समीरही शिरला. त्या इमारतीत अनेक दालने होती. प्रत्येक दालनात वैशिष्ट्यपूर्ण असे काहीतरी होते. कुठे वेगवेगळ्या मूर्त्या होत्या. कुठे भिंतीवर चित्रे काढलेली होती, कुठे झुंबर खुप मोठे, भव्य व आकर्षक होते. असे एक एक दालने ओलांडत रजनी एका दालानपाशी थांबली. तिथल्या द्वारपालाशी ती काहीतरी बोलली आणि समीरला तिने आत येण्यास सांगितले. समीरने त्याच्या पायातील वाहणा बाहेर काढून ठेवल्या. त्या द्वारपालाने त्याची सन्दुक तपासली व आत सोडले. समीरने आत पाय ठेवातच त्याचा पाय दोन बोटे अगदी खालीच गेला आणि अगदी मऊ, रेशमी, मुलायम स्पर्श त्याला जाणवला. खाली पाहतो तर काय, सर्व दालनभर एक सुन्दर नक्षीकाम केलेला गालीचा अंथरलेला होता. दुसरा पाय पुढे ठेवला तोही दोन बोटे खाली गेला. समीरला वाटले की आपण तर ढगावरूनच चालत आहोत. तेथे मेज व खुर्च्या होत्या. एका कोपऱ्यात पखवाज, मृदुंग, तानपुरा, चाळ, घटम्, वीणा अशी वाद्ये ठेवलेली दिसली. रजनीने त्याला खुर्चीवर बसायला सांगितले. तो एका खुर्चीवर बसला तर ती इतकी मऊ होती की त्याला वाटले की तो अगदी हवेवरच तरंगत आहे. रजनी त्याला म्हणाली, "तू इथे बस. मी आत जाऊन येते." एवढ्यात एक दासी तेथे एक तबक हातात घेऊन हजर झाली. त्या तबकात चान्दीच्या दोन उंच सुरई व चान्दीचे दोन-तीन पेले होते. तिने समीरला मोठ्या अदबीने विचारले, "शर्करोदक घेणार ?" (शर्करोदक = शरबत) "नको, एवढ्या सकाळी गुळ पाण्याची आवश्यकता नाही..." समीर.

"हे गुळ पाणी नाही, त्यामुळे प्यायला काहीच बाधा नाही." असे म्हणत तिने त्या सुरईमधून पेल्यात शरबत ओतले. त्या केशरी रंगाच्या शरबताची धार पेल्यामधे पडत असतानाच एक चांगला सुगन्धी त्याला आला. भरलेला प्याला तिने समीरला दिला. त्याने तो समोर मेजावर ठेवला व आधी आपल्या बांगड्या व्यवस्थित आहेत का ते पाहिले. नन्तर थोड्या वेळाने एक घोट ते शरबत पिले तर तो अगदी खुषच झाला. हे असले शरबत त्याने आधी कधीच पिले नव्हते, त्याने फक्त, लिम्बाचे, कैरीचे, आवळ्याचे असेच शरबत पिले होते. या शरबतात केशर, वेलदोडा, मध, बदाम, पिस्ता, आक्रोड, गोडांबी अजून बरेच काही टाकलेले होते. त्याला वाटले की हे शरबत नाही तर अमृतच आहे. समीरला जे दिसेल ते सर्वकाही अपरिचित व नविनच होते. एवढे मोठे वैभव त्याने कधीच पाहिले नव्हते. (क्रमशः)


**पत्ता : १२, वासुदेवानंद, ६५१, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०**

**विद्युत पत्र :** aniket.bhalerao@rocketmail.com



**नाव : अनिकेत भालेराव.**

**भ्रमणध्वनी : ९४२२५०४६०८**


# पक्ष्यांचा राजा

उंच आकाशी वेगवान
गरूडाची उड्डाण
आकाशात भ्रमण करतो
हरपून देहभान

आकाराने खुप मोठा
शरीर भारदस्त
आकाशी उडतांना
दिसतो किती मस्त

तीक्ष्ण नजरेनं
सावज तो हेरतो
बळकट चोचीने
साप, उंदीर धरतो

पायाची नखे त्याच्या
मजबूत व धारदार
संकटात शत्रूवर
ताकदीने करतो वार

तपकिरी काळ्या रंगाचा
गरूड विष्णूचे वाहन
पक्ष्यांच्या राज्याचा
मिळाला त्याला मान




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


# घामाची पेरणी

कोरड्या डोळ्यात
पावसाची आस
शिवार भकास
आता सारे

कोरड्या मातीची
करूण कहाणी
घामाची पेरणी
कोमजली

सरलय पाणी
ओल हरवली
माती भेगाळली
वावराची

असा हा दुष्काळ
उभा डोईवर
भाळी मरमर
पोशिंद्याच्या

तरी लढतोय
माझा बळीराजा
रोज जरी सजा
जगण्याची




**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**


# अभिमान मराठीचा

अभिमान मराठीचा,
इथे प्रत्येकाला वाटे.
बोलताना मायबोली,
गळा प्रत्येकाचा दाटे.

मायबोली मराठीत,
आहे अभंगाचे साठे.
ज्ञानेश्वर तुकोबांचा,
योगदान आहे मोठे.

अभिजात मराठीचे,
चला गाऊ गुणगान.
भाषा शिकुनी मराठी,
चला होऊ धनवान.

माय मराठीचा मळा,
सदा शब्दांनी फुलावे.
शब्द बोलता मराठी,
गाली आनंद खुलावे.

अभिजात मराठीचे,
चला वाजवू नगारे.
शब्द तोलुन बोलावे,
उडे हास्याचे फवारे.




**नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**



## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०४ ऑक्टोबर २०२६


## कामक्षा देवी महाविद्यालयाचे दोन विद्यार्थी राज्यस्तरावर



**किनगांव राजा (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य क्रीडा संचलनालय पुणे यांच्या मार्फत आयोजीत विभागीय स्तरीय फ्री स्टाईल कुस्ती व ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल अमरावती येथे दोन दिवसीय आयोजित करण्यात आल्या होत्या त्यामध्ये तालुक्यातील किनगांव राजा येथील कामक्षा देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी शुभम रवींद्र शिरसाठ यांने फ्री स्टाईल कुस्ती १९ वर्ष वयोगटामध्ये ६५ किलो वजन गटामध्ये अमरावती विभागीय स्तरीय प्रथम क्रमांक प्राप्त केला.तर ओमकार सुनील काकड यांने ग्रीको रोमन कुस्ती १७ वर्ष वयोगटामध्ये ४८किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रे ठरले आहे.हा राज्यस्तरीय फ्री स्टाईल कुस्ती व ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धेमध्ये अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.विजयी विद्यार्थ्यांचे स्वागत व अभिनंदन शाळेचे अध्यक्ष शिवाजीराव काळुसे यांनी केले आहे. यावेळी प्राचार्य उद्धव दराडे,क्रीडा प्रशिक्षक सुनील काकड,राजू चंदवडे, सहाय्यक शिक्षक रामदास सानप, प्रकाश सोनुने,संजय केकान,गजानन मुंढे,राजीव मांटे, नितीन खरात,गजानन थिगळे,संजय काळुसे,उद्धव राठोड, धम्मपाल गवई, गोपाळ पवार,गणेश काळुसे, रामेश्वर हरकळ,गजानन काळुसे यांच्यासह आदीजण उपस्थित होते.

## जीवन विकास ग्रंथालयात म. गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** जीवन विकास ग्रंथालय, टिळक नगर, छत्रपती संभाजीनगर येथे हिंदूस्थानला सहिष्णुता आणि अहिंसा यांचा संदेश देणारे महात्मा मोहनदास करमचंद गांधी आणि जय जवान जय किसान संदेश देणारे भारताचे कणखर पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात "स्वच्छता हीच सेवा, सत्य व अहिंसेचे महत्त्व" तसेच 'जय जवान व जय किसान' या दोघांच्या विचारांवर मार्गदर्शन करण्यात आले. प्रसिद्ध शिल्पकार श्री रमेश जाधव यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी ग्रंथालयाचे नियमित वाचक तसेच ग्रंथालय कर्मचारी सौ. अंकुशे, लक्ष्मण मोरे, शांतीलाल जाधव आणि श्रीमती गुरसहानी अभ्यासिकेच्या कर्मचारी सौ.अश्विनी काजवे व विद्यार्थी उपस्थित होते.

## माळीवाड्यात जिल्हाधिकाऱ्यांकडून पीक नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी; शेती नुकसानीचे पंचनामे अधिक वेगाने करण्याचे आदेश



**दौलताबाद (जावेद अहमद) :** दुष्काळी परिस्थितीमुळे झालेल्या पीक नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी माळीवाडा येथील शेतांवर जाऊन पाहणी केली. जिल्ह्यात शेती नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले असून, हे काम अधिक वेगाने करण्याचे आदेश त्यांनी संबंधित यंत्रणेला दिले आहेत. "शासन दुष्काळी परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देत असून, शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल," असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना दिले.वरिष्ठ अधिकाऱ्यांचा ताफा उपस्थितया पाहणी दौऱ्यादरम्यान उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, तहसीलदार उमेशजी पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, जिल्हा परिषद सदस्या लंकाताई जाधव, गटविकास अधिकारी शिवाजी साळुंके, आणि ग्रामपंचायत अधिकारी बाळकृष्ण गव्हाणे उपस्थित होते. तसेच माळीवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक व विस्तार अधिकारी ओ. पी. चव्हाण, तालुका कृषी अधिकारी मेघशाम गुळवे, दौलताबाद ग्रामपंचायत अधिकारी किशोर गव्हाणे आणि मीनाक्षी मगर या अधिकाऱ्यांनीही माळीवाडा परिसरातील दुष्काळग्रस्त पिकांची पाहणी करून नुकसानीची सविस्तर माहिती घेतली.शेतकऱ्यांशी साधला थेट संवाददौऱ्यादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांसह सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. दुष्काळी परिस्थिती, पिकांची सध्याची अवस्था आणि झालेल्या एकूण नुकसानीबाबत त्यांनी शेतकऱ्यांकडून अडचणी जाणून घेतल्या.अचूक आणि वस्तुनिष्ठ पंचनाम्यांवर भरपीक नुकसानीचे योग्य मूल्यांकन करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या त्रिस्तरीय समितीने प्रत्यक्ष शेतावर जाऊन नोंदी घेण्याचे काम केले. या समितीमध्ये ग्राम महसूल अधिकारी प्रशांत वनकर, कृषी सहाय्यक रंगनाथ पिसाळ, ग्रामपंचायत अधिकारी बाळकृष्ण गव्हाणे, ग्राम महसूल अधिकारी सुरज गिरी आणि पंच कमिटीचा समावेश होता. दुष्काळात अडकलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार योग्य ती मदत मिळावी, यासाठी प्रशासनाचा अचूक व वस्तुनिष्ठ पंचनामे करण्यावर मुख्य भर आहे.या पाहणीच्या वेळी पोलीस उपनिरीक्षक बापू डोंबाळे, रानुबा जाधव,प्रमोद साठे, तसेच शेतकरी जनार्दन मुळे, नंदकिशोर मुळे, मनीष गाजरे, नारायण गाजरे, मारुती फटांगडे, मुक्ताराम हेकडे, वैजनाथ हेकडे, आनंद गाजरे, सुरेंद्र जगधने, मिलिंद साठे, भगवान बनसोडे, गणेश आस्वार यांच्यासह परिसरातील नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिल्ह्यात शेती नुकसानी चे पंचनामे सुरू केले आहे अजून वेगाने करण्याचे आदेश दिले आहेशेतकऱ्यांना आव्हान करतो की शासन दुष्काळ परिस्थिती चे गांभीर्याने लक्ष देत आहे शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल :जिल्हा अधिकारी विनय गोंडा यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले आहे




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०४ ऑक्टोबर २०२६

## महसूल मंत्र्यांकडून दुष्काळग्रस्त शेतीची पाहणी दुष्काळग्रस्तांना भरीव मदत करणार



**अकोला/बीड (भगवंत पाळवदे)** : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत हेच शासनाचे प्राधान्य असून, त्यांना भरीव मदतीबरोबरच ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, पशुधनासाठी वैरण व्यवस्था, पेयजल व्यवस्था, जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणावर राबविण्यात येतील, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केले.महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत दुष्काळजन्य परिस्थितीबाबत उपाययोजनांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागाचा प्रत्यक्ष दौरा पाहणी होत आहे. महसूल मंत्र्यांनी अकोला तालुक्यातील येवता व बाळापूर तालुक्यातील मानकी येथील दुष्काळग्रस्त परिसराची पाहणी केली, तसेच शासकीय विश्रामगृह येथे शेतकरी व नागरिकांकडून निवेदनेही स्वीकारली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या व त्यांना दिलासा दिला. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, महापौर शारदा खेडकर आदी उपस्थित होते.महसूल मंत्री श्री बावनकुळे म्हणाले की, केंद्र शासनाची अधिकाधिक मदत मिळण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे निकष लक्षात घेऊन अचूक पंचनामे होणे गरजेचे असते. त्यामुळे पंचनामे जलदपणे व अचूक पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला त्यांनी दिले. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा-पाणी, पीक पंचनामे आणि शेतीसाठी पाणीपुरवठा यांना प्राधान्य देत प्रशासकीय यंत्रणेने युद्धपातळीवर व समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.केंद्र शासनाच्या मदतीबरोबरच राज्य शासनाची भरीव मदत व पीक विमा योजना व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच रोजगार निर्मिती व जलसंधारणाची अधिकाधिक कामे राबविण्यात येतील. पेयजल उपलब्धतेच्या दृष्टीने पाण्याचे योग्य नियोजन करण्यात येईल. 'गावातले पाणी गावात, शिवारातले पाणी शिवारात' अशा पद्धतीने पाण्याचा थेंबनथेंब वाचविण्याचे दृष्टीने ग्रामीण भागात जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणावर राबवण्यात येतील. दुष्काळामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन व संपूर्ण यंत्रणा भक्कमपणे उभी आहे. जिल्हा नियोजन निधीचा दुष्काळ निवारणासाठी प्रभावी वापर करण्यात येईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. बँकांनी शेतकऱ्यांची व्यथा जाणून संपूर्ण सहकार्य करावे. त्यांना कुठलाही त्रास होता कामा नये. दुष्काळी परिस्थितीत बँकांनी कोणत्याही शेतकऱ्याकडे कर्ज वसुलीसाठी सक्तीचा तगादा लावू नये. अवैध सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक किंवा फसवणूक होत असल्यास, नागरिकांनी न घाबरता यंत्रणेकडे थेट अर्ज करावा, असे त्यांनी सांगितले.शेतकरी बांधवांच्या पाठीशी संपूर्ण यंत्रणाशेतकरी बांधवांनी या संकटात हिंमत सोडू नये. संपूर्ण यंत्रणा त्यांच्या पाठीशी आहे. शेतकरी बांधवांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिलीशेतक-यांशी संवाद व शिदोरी जेवणयेवता येथील शेतकरी शेख रशीद शेख इस्माईल, तसेच बाळापूर तालुक्यातील हरिश्चंद्र शिरसाठ यांच्या शेतात सोयाबीन पिकाच्या नुकसानाची पाहणी त्यांनी केली. शेख रजू शेख रशीद यांनी शेतात विहीर असतानाही पाण्याची कमतरता, भूजल पातळीतील घट याबाबत माहिती दिली. महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी देगाव शेतकरी बंधा-यावर संजय अवचार यांच्या शेतीमध्ये पाहणी करून शेतकऱ्यांसोबत शिदोरी जेवण त्यांनी घेतले. यावेळी अनेक पदाधिकारी, अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## सायबर विश्वात मुलींना जाळ्यात ओढणाऱ्या विकृताला ५ वर्षे सक्तमजुरी

**ठाणे/बीड (भगवंत पाळवदे)** : सोशल मीडियाचा गैरवापर करून अल्पवयीन मुलींना अश्लील मेसेज, फोटो आणि व्हिडिओ पाठवून त्यांचा विनयभंग व मानसिक छळ करणाऱ्या एका विकृत तरुणाला ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. अनिता नेवसे यांनी आरोपी मंगेश ईश्वरदास तांबे (वय २८, रा. उत्तन) याला माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत ५ वर्षे सक्तमजुरी व ५० हजार रुपये दंड, तसेच भादंवि कलम ३५४(अ) अन्वये ३ वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. दंडाची ही रक्कम पीडितांना नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. सागरी उत्तन पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या आरोपी मंगेश तांबे याने डिसेंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत सायबर गुन्हेगारीचा कुटील डाव रचला होता. त्याने सुरुवातीला फेसबुकवर 'विद्या' या नावाने मुलीचे खोटे प्रोफाईल तयार केले आणि फिर्यादी तरुणीला 'फ्रेंड रिक्वेस्ट' पाठवली. समोरील व्यक्ती मुलगीच आहे असे वाटल्याने फिर्यादीने ती विनंती स्वीकारली. मात्र, चॅटिंगदरम्यान आरोपीने हळूहळू अश्लील फोटो पाठवण्यास सुरुवात केली.संशय आल्याने फिर्यादीने थेट व्हिडिओ कॉल केला असता स्क्रीनवर मुलगी नसून एक पुरुष असल्याचे उघड झाले. या प्रकाराने घाबरलेल्या फिर्यादीने त्याचा नंबर तात्काळ ब्लॉक केला.बदल्याच्या भावनेतून विकृतीची परिसीमा.. नंबर ब्लॉक केल्याच्या रागातून आरोपी मंगेश तांबे याने फिर्यादीच्याच नावाने बनावट फेसबुक अकाउंट उघडले. या बनावट खात्यावरून त्याने फिर्यादीची चुलत बहीण आणि तिच्या अल्पवयीन मैत्रिणींना अत्यंत अश्लील मेसेज, फोटो व व्हिडिओ पाठवण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता, मुलींना धमकावून त्यांचे लैंगिक शोषण करण्याचा प्रयत्न केला आणि तंत्रज्ञानाच्या आधारे त्यांच्या लज्जेचे धिंडवडे काढले. अखेर या त्रासाला कंटाळून फिर्यादीने सागरी उत्तन पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध विनयभंग, पोक्सो आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्याला गजाआड केले.न्यायालयात सरकारी पक्षाचा भक्कम युक्तिवाद खटल्याची सुनावणी ठाणे सत्र न्यायालयात पार पडली. सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील श्रीमती भामरे-पाटील यांनी अत्यंत प्रभावी युक्तिवाद केला. आरोपीचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्षाने तब्बल ९ महत्त्वाचे साक्षीदार तपासले. साक्षीदारांचे जबाब, डिजिटल पुरावे आणि सादर करण्यात आलेले कागदपत्रे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. या न्यायालयीन कामकाजात सरकारी वकिलांना कोर्ट पैरवी पोलीस हवालदार दिलीप सनेर यांनी मोलाचे सहकार्य केले.न्यायालयाचा निकाल व शिक्षा: माहिती तंत्रज्ञान अधिनियम (कलम 67 अ): 5 वर्षे सक्तमजुरी आणि 50 हजार रुपये दंड (दंड न भरल्यास 6 महिने अतिरिक्त कारावास). भादंवि (कलम 354 अ - विनयभंग): 3 वर्षे सक्तमजुरी आणि 10 हजार रुपये दंड. पीडितांना दिलासा: न्यायालयाने आरोपीकडून वसूल करण्यात येणारी दंडाची रक्कम पीडितांना नुकसानभरपाई म्हणून देण्याचे निर्देश दिले आहेत. "सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी संवाद साधताना आणि फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना सतर्क राहणे किती गरजेचे आहे, हे या घटनेवरून पुन्हा एकदा समोर आले आहे. तसेच तंत्रज्ञानाचा गैरवापर करून महिला व मुलींची विटंबना करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा सज्जड इशाराच या निकालातून समाजात गेला आहे

## स्वराज्यासोबत 'स्वभाषे'चा नारा शिवरायांनीच दिला संत साहित्यापासून ते महामानवांपर्यंत समाजाला दिशा देण्याचे काम

**मुंबई** : संत साहित्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'स्वभाषे'च्या आग्रहापर्यंत आणि महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवांच्या समतेच्या विचारांपर्यंत समाजाला दिशा देण्याचे महान कार्य माय मराठीने केले असून, ही समृद्ध भाषा आपल्या सर्वांसाठी नितांत अभिमान आणि स्वाभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. मराठी अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, खरं तर ही भाषा अतिशय सुंदर अशी भाषा आहे. जी शाहीरांनी लोककलावंतांनी फुलवली. जी भाषा भक्तीच्या रूपाने आपल्या सर्वांना पाहायला मिळाली. चक्रधर स्वामी यांच्या काळात आद्यग्रंथ म्हणतात लिळाचरित्र ग्रंथ असो, ज्ञानेश्वरांनी रचलेली ज्ञानेश्वरी असो, संत तुकाराम महाराजांनी आपल्या ओव्यांमधून, अभंगांच्या माध्यमातून दिलेले ज्ञान असो, या प्रत्येक गोष्टीने आपल्या माय मराठीचे माहात्म्य आपल्या पर्यंत पोहोचवला. छत्रपती शिवाजी महाराजांनी तर केवळ स्वराज्याचा नारा नाही दिला. स्वराज्यासोबत स्वभाषेचा नारा देखील छत्रपती शिवरायांनी दिला आणि पहिल्यांदा मराठी भाषेसाठी, संपूर्ण राज्यकारभार मराठी भाषेत चालला पाहिजे त्यासाठी मराठी राजभाषा कोष निर्माण करणारे पहिले राजे जर कोणी असतील तर ते छत्रपती शिवाजी महाराज होते. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराजांपासून ते लोकमान्य टिळक यांच्या पर्यंत सर्वांनीच स्वराज्याची भूमिका याच मराठीच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचवली. महात्मा फुले असतील, न्यायमूर्ती रानडे असतील, आगरकर असतील, गोखले असतील, ज्यांनी सुधारणांच्या माध्यमातून समाजात एक विचार रुजवला. हा विचार रुजवताना मराठी भाषेतूनच रुजवण्याचे काम केले. छत्रपती शाहू महाराज असतील, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असतील ज्यांनी समाजात समतेचे बीजारोपण केले. हे समतेचे बीजारोपण करताना त्यांची भाषा देखील माय मराठी होती. ही आपल्यासाठी अभिमानाची आणि स्वाभिमानची बाब आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०४ ऑक्टोबर २०२६


## बापजाद्यांनी जमीन जपली, आपण पाणी जपूया!




त्रैमासिक तिफण, सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती आणि शिवार संसद , आयोजित दुष्काळ व पाणी परिषदेसाठीमंचावर उपस्थित असलेले सर्व सन्माननीय मान्यवर, जलतज्ञ, कृषी अभ्यासक, पत्रकार बांधव आणि माझ्या समोर बसलेले माझ्या काळ्या आईचे खरे मालक असलेले शेतकरी बांधवांनो,आज या चौका नगरीत आपण एका अत्यंत गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी आज दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी एकत्र जमलो आहोत. विषय आहे - दुष्काळ आणि पाणी. खरं तर हा विषय आजचा नाही, तो शेकडो वर्षांचा आहे. पण आज त्याची तीव्रता इतकी वाढली आहे की, आता बोलल्याशिवाय, लढल्याशिवाय पर्यायच उरला नाही.मी ज्या देशगव्हाण या छोट्याशा खेड्यात जन्मलो, जिथे शेती हाच जगण्याचा आधार होता. माझ्या वडिलांनी मला नेहमी सांगितलं - बेटा, शेती कधी दगा देत नाही, माणूस दगा देतो. पण आज मला असं वाटतंय की, आपणच आपल्या शेतीला दगा दिला आहे.आपला परिसर आणि बदललेले चित्र -आपला हा कन्नड-चौका पट्टा म्हणजे अजिंठा डोंगा कुशीतला प्रदेश. एकेकाळी या भागात मुबलक पाणी होते. घाटमाथ्यावरून येणारे झरे, दाट जंगल, आणि त्या जंगलातून वाहणारे ओढे-नाले. ३०-४० वर्षांपूर्वी या भागात ३० फुटावर पाणी लागायचे. विहिरीला मोटार नव्हती, रहाट होता. पावसाळ्यात शेतात पाय ठेवायला जागा नसायची.आणि आज चित्र काय आहे? आज ५०० फूट बोर मारूनही पाणी नाही. टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. शेतकरी हतबल झाला आहे. पोरं गाव सोडून पुणे-मुंबईला जातात. हे चित्र का बदलले? निसर्ग बदलला का? नाही. माणूस बदलला. आपली नियत बदलली. आपण निसर्गाला ओरबाडायला सुरुवात केली आणि निसर्गाने आपल्याला वाळवायला सुरुवात केली.दुष्काळाची तीन मूळ कारणे -मी गेल्या वीस वर्षांपासून या विषयाचा अभ्यास करतोय. मला तीन कारणे प्रकर्षाने जाणवतात.*

पहिलं कारण - डोंगर बोडके झाले. आपण डोंगरावरची झाडे तोडली. गायराने विकली, गिळली. ज्या डोंगराने पावसाचे पाणी धरून ठेवायचे, हळूहळू जमिनीत जिरवायचे, तोच डोंगर आज सिमेंटच्या टेकडीसारखा झाला आहे. पाणी पडतं आणि थेट वाहून जातं. जमिनीत जिरतच नाही. त्यामुळे भूजल पातळी वर्षागणिक खालावत चालली आहे.* दुसरं कारण - शिवाराची रचना मोडली.पूर्वी शेताला मोठा बांध असायचा. बांधावर बोरी, बाभळी, आंब्याची झाडं असायची. बांधावरचं गवत जनावरांना मिळायचं. तो बांध म्हणजे पाणी अडवण्याची नैसर्गिक भिंत होती. आज आम्ही आधुनिक झालो. ट्रॅक्टर आले आणि आम्ही दोन फुटासाठी बांधच काढून टाकले. शेत सपाट केले. आता पाणी अडवायला जागाच नाही. पाणी आलं की थेट शेताबाहेर.तिसरं कारण - पाण्याचा बेसुमार उपसा आणि चुकीची पीक पद्धती. आपल्याकडे पाणी कमी, पण आपण पिकं घेतो जास्त पाणी लागणारी. या भागात ज्वारी, बाजरी, मूग, उडीद ही कमी पाण्याची पिकं पारंपरिक होती. आज आपण मोसंबी, कापूस, मका यांसारखी पिकं घेतो आणि त्यासाठी दिवस-रात्र बोरमधून पाणी उपसतो. म्हणजे बँकेतून फक्त पैसे काढायचे, पण भरायचेच नाहीत. अशी बँक किती दिवस चालेल? तशीच आपल्या जमिनीची अवस्था झाली आहे.शासनाच्या योजना - अपेक्षा आणि वास्तव -शासन जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, मनरेगा, अमृत सरोवर अशा अनेक चांगल्या योजना राबवते. मी त्यांचे मनापासून स्वागतच करतो. पण या योजना जेव्हा कंत्राटदाराच्या हातात जातात, तेव्हा त्यांचा आत्मा निघून जातो. बंधारा बांधला जातो पण पहिल्याच पावसात फुटतो. तलावातला गाळ काढला जातो पण तो पुन्हा त्याच तलावाच्या बांधावर टाकला जातो. त्यामुळे तो पावसात पुन्हा तलावातच जातो.म्हणून मी नेहमी सांगतो - पाणी ही सरकारी योजना नाही, ती लोकचळवळ आहे. जोपर्यंत गावातला प्रत्येक माणूस, प्रत्येक महिला, प्रत्येक तरुण स्वतः कुदळ घेऊन, श्रमदान करून काम करत नाही, तोपर्यंत पाणी थांबणार नाही. शासन फक्त मदत करू शकते, पाणी गावालाच अडवावे लागेल.आपल्याला काय करायला हवं? माझा पंचसूत्री कार्यक्रम या परिषदेत फक्त रडगाणं गाऊन चालणार नाही. उपाय सांगावे लागतील. म्हणून मी आपल्यासमोर पाच ठोस उपाय ठेवतो.१. गाव तिथे जल आराखडा - प्रत्येक ग्रामपंचायतीने आपला पाण्याचा हिशोब केला पाहिजे. आपल्या गावात किती पाऊस पडतो, किती पाणी वाहून जाते, किती जिरते, किती लागते याचा आराखडा तयार झाला पाहिजे. त्याशिवाय नियोजन होणार नाही.२. पाणी अडवा, पाणी जिरवा - युद्धपातळीवर - येत्या पावसाळ्यापूर्वी प्रत्येक शेतात शोषखड्डा, माती नाला बांध, प्रत्येक ओढ्यावर लूज बोल्डर बंधारा, गॅबियन बंधारा, सिमेंट बंधारा आणि डोंगरावर सलग समतल चर (CCT) खोदले पाहिजेत. हे काम एका दिवसात होणार नाही, पण दरवर्षी थोडं थोडं केलं तरी पाच वर्षांत गाव पाणीदार होईल.* ३. पाणी वापर संस्था आणि पाणी पंचायत -* * पाणी ही विकण्याची वस्तू नाही. ती जगण्याची बाब आहे. पाण्यावर गावाचा अधिकार असला पाहिजे. पाणी पंचायत मजबूत झाली पाहिजे. पाण्याचे वाटप न्यायाने झाले पाहिजे. पाणी चोरांवर गावानेच बंधन घातले पाहिजे.* ४. देशी बियाणे आणि कमी पाण्याची शेतीकडे परत चला - आपल्याला पुन्हा ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, मूग, उडीद यांच्याकडे यावे लागेल. ही पिकं कमी पाण्यात येतात, कमी खर्चात येतात, बाजारात जास्त भाव खातात आणि तब्येतीला चांगली असतात. हाच खरा शाश्वत मार्ग आहे.५. झाडे लावा, झाडे जगवा - प्रत्येक शेताच्या बांधावर, प्रत्येक मोकळ्या जागेवर, प्रत्येक शाळेच्या पटांगणात झाड लावले पाहिजे. एक कुटुंब, एक झाड ही मोहीम राबवली पाहिजे. कारण झाड म्हणजे पाण्याचा कारखाना आहे. झाड असेल तरच पाणी असेल आणि पाणी असेल तरच उद्याचे भविष्य असेल.शेवटचा संदेश - माझ्या बापजाद्यांनी माझ्यासाठी जमीन जपून ठेवली. मी माझ्या मुलांसाठी काय जपून ठेवणार आहे? जर मी त्यांच्यासाठी पाणीच जपून ठेवले नाही, तर माझी जमीन त्यांना काय कामाची?मित्रांनो, दुष्काळ हा आपल्या नशिबात नाही, तो आपल्या दुर्लक्षात आहे. दुर्लक्ष दूर केले की दुष्काळ दूर होईल.म्हणून चला, आज या चौका नगरीतून आपण एक सामूहिक शपथ घेऊया -"बापजाद्यांनी जमीन जपली, आपण पाणी जपूया! येणाऱ्या पावसाचा एकही थेंब आम्ही वाया जाऊ देणार नाही. आमच्या शिवारात पडलेले पाणी आमच्याच शिवारात जिरवू. आणि आमचा दुष्काळ आम्हीच संपवू."एवढेच बोलून मी माझे मनोगत थांबवतो.धन्यवाद!जय जवान, जय किसान, जय महाराष्ट्र!

**प्रा. डॉ. शिवाजी हुसे**
**संयोजक : दुष्काळ व पाणी परिषद, चौका**
**जि. छत्रपती संभाजीनगर**

## शिक्षण हे गुलामी नष्ट करण्याचे हत्यार - डॉ. प्रतिभाताई अहिरे



**छ. संभाजीनगर (प्रतिनिधी) :** शिक्षणाकडे बहुजनांना वळवून ज्योतीबा,सावित्रीबाईनी समाजसुधारणेच्या श्रृंखलेत शिक्षण या संकल्पनेला क्रांतीकारक मूलाधार देवून शिक्षणच खऱ्या अर्थाने दृष्टी आणि दृष्टिकोण बदलून टाकण्याचे बहुजन समाजाचे एक महत्वाचे साधन असल्याचे प्रतिपादन प्रसिध्द लेखिका - प्रतिभाताई अहिरे यांनी' महत्मा फुले यांचे विचार आणि आजचे समाज वास्तव' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद व मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय,आयोजित 'संवाद प्रतिभावंताशी' या सृजनशील उपक्रमात तिसरे पुष्प गुंफताना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध सामाजिक कार्यकत्या डॉ. प्रज्ञाताई साळवे होत्या. मंचावर परिषदेचे अध्यक्ष डॉ मोहन सौंदर्य प्राचार्य डॉ. नवनाथ गोरे, डॉ. युवराज धबडगे, डॉ. शिवाजी डोळसे आदींची उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. प्रतिभाताई अहिरे म्हणाल्या की,खऱ्या अर्थाने ज्योतीबा, सावित्रीबाई, छ. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महापुरुष समाजसुधारक पेक्षा क्रांतीकारक म्हणून अधिक सरस ठरतात.कारण त्यांच्या समाज सुधारनेत शिक्षणाला अधिक महत्व असल्याने हे शिक्षण घेवूनच समाज प्रगल्भ बनत असतो.शिक्षणानेच त्यांच्यात वैचारिक परिपक्कवता येते.ही वैचारिक परिपक्वता फुले दाम्पत्यांनी १८व्या शतकात प्रतिगामी शक्तीच्या विरोधात जाऊन बहुजन समाजाला शिक्षण देवून समाजातील दारिद्य गुलामी झुगारुन स्वाभिमानाचे जीवन जगण्याचे शिक्षण हे एक हत्यारच असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. या विषयाच्या अनुषंगाने डॉ.अहिरे यांनी सावित्रीबाई,म. फुले हे खरोखरच क्रांतीची पाठशाळा होते. त्यांचे कार्य आणि कृतृत्व समाजाला दृष्टी आणि दृष्टीकोण देणारे असून फुले-आंबेडकरी विचार ही जैविक गोष्ट नाही तर ती एक बौध्दिक प्रक्रिया असल्याचे उदगार त्यांनी आपल्या भाषणात काढले.अध्यक्षीय समारोप करतांना डॉ प्रज्ञाताई साळवे म्हणाल्या की, महिलांना केवळ स्त्री किंवा महिला म्हणून नव्हे तर माणूस' म्हणून बघावे, मानवमुक्तीच्या लढाईत त्यांनीही तेवढेच योगदान दिलेले आहे. सावित्रीमाईच्या सहकार्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले यांना समाज सुधारनेचे कार्य करता आले,मातारमाईच्या त्यागामुळे बाबासाहेबांना विदेशात सर्वोच्य पदव्या मिळवून दलितोध्दाराचे क्रांतीकारी कार्य करता आले,म्हणजेच स्त्रियांचे कष्ट, त्याग, समर्पण हे आजच्या परिप्रेक्षात अत्यन्त प्रेरक असले तरी अशा वैचारिक कार्यक्रमाला महिला वर्गाची उपस्थिती मोठया प्रमाणात असली पाहिजे. येणाऱ्या 3 जानेवारीला सावित्रीबाई फुले यांची जयंती सर्वच देशबांधवानी मोठ्या प्रमाणात साजरी करण्याचे अवाहनही त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपातून केले.कार्यक्रमाची भूमिका परिषदेचे सचिव डॉ.युवराज धबडगे यांनी विशद केली, त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या अ.भा.शिव साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्या बद्दल प्रसिध्द लेखक डॉ सुभाष बागल याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. सुधाकर नवसागर,प्रसिध्द लेखक डॉ. भीमराव सरवदे, प्राचार्य. भगवान कांबळे , डॉ. ह.नि. सोनकांबळे चित्रकार राजानंद सुरडकर, प्रा अनिल दंडाळे,प्रा. सतीश वाघमारे, अभिमन्यु खरात,दिलीप संसारे, याच्यासह शहरातील रसिक मोठया प्रमाणात उपस्थित होते.कार्यक्रमाचे बहारदार संचालन प्रसिद्ध निवेदक प्रा. पंकज शिंदे यांनी तर आभार डॉ.मिलिंद वाव्हळे यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०४ ऑक्टोबर २०२६


## वडार जमातीचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान : भारताच्या इतिहासाच्या पायाभरणीतील अदृश्य हात

भारताच्या राष्ट्रनिर्मितीचा इतिहास लिहिताना राजे, सरदार, सेनानी, समाजसुधारक आणि राजकीय नेत्यांच्या योगदानाची नोंद मोठ्या प्रमाणावर झाली आहे. मात्र या राष्ट्राच्या भौतिक पायाभरणीत ज्यांनी आपल्या हातांनी दगड फोडला, माती वाहिली, विहिरी खोदल्या, तलाव बांधले, रस्ते तयार केले आणि गड-किल्ल्यांच्या उभारणीत श्रम केले, अशा श्रमजीवी समुदायांचा इतिहास तुलनेने दुर्लक्षित राहिला आहे. वडार समाज हा अशाच ऐतिहासिक श्रमपरंपरेचा महत्त्वाचा घटक आहे. वडार समाजाचा इतिहास केवळ एका जातसमूहाचा इतिहास म्हणून पाहता येत नाही. तो भारतातील स्थलांतरित, बांधकामाशी निगडित आणि पारंपरिक कौशल्याधारित श्रमसमुदायांच्या इतिहासाशी जोडलेला आहे. दगड, माती, पाणी आणि रस्ते या चार मूलभूत घटकांशी वडार समाजाचे पारंपरिक जीवन व व्यवसाय जोडलेले होते. त्यामुळे भारताच्या भौतिक विकासाच्या अनेक टप्प्यांमध्ये त्यांचा श्रम अप्रत्यक्षपणे सामावलेला दिसतो.

दगडातून उभे राहिलेले इतिहासाचे शिल्प

महाराष्ट्राचा इतिहास गड-किल्ल्यांशिवाय अपूर्ण आहे. सह्याद्रीतील किल्ले, तटबंदी, बुरुज, दरवाजे, पायवाटा आणि संरक्षणव्यवस्थेच्या उभारणीत असंख्य कारागीर व श्रमिकांनी काम केले. त्यामध्ये दगडाशी संबंधित पारंपरिक कौशल्य असलेल्या समुदायांचा सहभाग महत्त्वाचा होता. किल्ला उभा राहतो तो केवळ राजाच्या आदेशाने नव्हे; त्यामागे हजारो हातांचे श्रम असतात. दगड कुठून आणायचा, तो कसा फोडायचा, आकार कसा द्यायचा, वाहतूक कशी करायची आणि बांधकामात त्याचा उपयोग कसा करायचा या संपूर्ण प्रक्रियेत पारंपरिक दगडकाम करणाऱ्या समाजांचे कौशल्य आवश्यक होते. इतिहासाच्या लोकप्रिय कथनात मात्र किल्ल्याचा निर्माता राजा म्हणून समोर येतो आणि त्याच्या उभारणीत श्रम करणाऱ्या समुदायांची नावे मागे पडतात. त्यामुळे राष्ट्रनिर्मितीच्या इतिहासाचा सामाजिक विस्तार करण्याची गरज आहे. जलव्यवस्थेतील योगदान प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात पाण्याची उपलब्धता ही कोणत्याही वस्तीच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक होती. विहिरी, तलाव, बंधारे, पाणवठे आणि जलसाठ्यांच्या निर्मितीत विविध श्रमसमुदायांनी महत्त्वाची भूमिका बजावली. वडार समाजाच्या पारंपरिक व्यवसायात दगड फोडणे, मातीचे काम आणि विहीर खोदण्यासारख्या कामांचा समावेश होता. त्यामुळे ग्रामीण आणि नागरी वस्तीच्या जलव्यवस्थेच्या निर्मितीशी त्यांचा संबंध निर्माण झाला. आज आपण पाणीपुरवठा व्यवस्था, धरणे आणि आधुनिक जलसंधारण यांचा अभिमान बाळगतो; परंतु या आधुनिक व्यवस्थेपूर्वी गावोगावी निर्माण झालेल्या पारंपरिक जलस्रोतांच्या निर्मितीत श्रम करणाऱ्या समुदायांचा इतिहासही तितकाच महत्त्वाचा आहे. रस्ते आणि वाहतुकीच्या विकासामागचे श्रम राष्ट्रनिर्मितीमध्ये रस्त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. व्यापार, प्रशासन, सैन्याची हालचाल आणि विविध प्रदेशांतील सामाजिक-सांस्कृतिक देवाणघेवाण रस्त्यांमुळे शक्य झाली. रस्ते तयार करण्यासाठी जमीन समतल करणे, दगड फोडणे, खडी तयार करणे, माती वाहून नेणे आणि बांधकामासाठी साहित्य उपलब्ध करून देणे या श्रमांची आवश्यकता असते. पारंपरिक काळापासून आधुनिक काळापर्यंत अशा श्रमांमध्ये वडार समाजातील अनेक कुटुंबांचा सहभाग राहिला. आजच्या महामार्गांच्या युगात यंत्रसामग्रीने अनेक कामे सोपी केली असली तरी या तंत्रज्ञानापूर्वी रस्ते उभारणाऱ्या पिढ्यांचा श्रम विसरता कामा नये. श्रमाला प्रतिष्ठा देणारा इतिहास आवश्यक वडार समाजाच्या योगदानाचा विचार करताना एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. इतिहासात श्रम करणाऱ्या माणसाचे स्थान कुठे आहे? राजकीय इतिहासात सत्ताधीशांच्या निर्णयांची नोंद केली जाते. लष्करी इतिहासात युद्धांची नोंद केली जाते. वास्तुशास्त्रीय इतिहासात भव्य वास्तूंची नोंद केली जाते. पण त्या वास्तूंच्या निर्मितीसाठी आपले आयुष्य खर्च करणाऱ्या मजुरांची, कारागिरांची आणि पारंपरिक कौशल्य असलेल्या समुदायांची नोंद अनेकदा मर्यादित राहते. हीच इतिहासलेखनातील एक मोठी पोकळी आहे. वडार समाजाच्या योगदानाकडे पाहताना त्याला केवळ 'मजुरी' म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. दगडाचे स्वरूप ओळखणे, त्याचा उपयोग ठरवणे, तो योग्य आकारात आणणे, कठीण भौगोलिक परिस्थितीत काम करणे आणि पिढ्यान्‌पिढ्या कौशल्य पुढे नेणे ही एक प्रकारची पारंपरिक तांत्रिक ज्ञानव्यवस्था होती. भटक्या जीवनपद्धतीची किंमत वडार समाजाच्या इतिहासातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची पारंपरिक स्थलांतरित जीवनपद्धती. कामाच्या शोधात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे ही त्यांच्या जीवनाची गरज होती. स्थिर शेतीप्रधान समाजव्यवस्थेत स्थिर घर, जमीन आणि गावाशी जोडलेपण यांना सामाजिक प्रतिष्ठेचे मापदंड मानले गेले. त्याच्या तुलनेत सतत स्थलांतर करणाऱ्या समाजांचे योगदान दस्तऐवजीकरणात कमी दिसते. परंतु स्थलांतर हे केवळ अस्थिरतेचे लक्षण नव्हते; ते त्यांच्या पारंपरिक व्यवसायाशी जोडलेले होते. जिथे बांधकाम, दगड, रस्ता किंवा जलस्रोत निर्मितीचे काम असे, तिथे त्यांचे श्रम पोहोचत होते. त्यामुळे त्यांच्या भटक्या जीवनाचा एक अर्थ असा देखील लावता येतो की त्यांनी विविध प्रदेशांच्या भौतिक विकासात श्रमाची जोड दिली. ब्रिटिश काळ आणि सामाजिक कलंक वडार समाजाचा आधुनिक इतिहास समजून घेताना ब्रिटिशकालीन प्रशासनातील वर्गीकरण आणि त्याचे सामाजिक परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. वसाहतिक काळात विविध भटक्या आणि स्थलांतरित समुदायांविषयी संशयाची प्रशासकीय दृष्टी निर्माण झाली. काही समुदायांना 'Criminal Tribes' म्हणून वर्गीकृत करण्यासाठी 1871 गुन्हेगार जमाती कायद्याचा वापर झाला. या प्रक्रियेमुळे अनेक समुदायांवर दीर्घकालीन सामाजिक गुन्हेगार हा कलंक बसला. स्वातंत्र्यानंतर गुन्हेगार जमाती कायद्या रद्द करण्यात आला आणि संबंधित समुदायांना विमुक्त जमाती (Denotified Tribes) म्हणून ओळख मिळाली; मात्र कायदेशीर कलंक दूर झाल्यानंतरही सामाजिक आणि आर्थिक परिणाम मोठ्या प्रमाणावर टिकून राहिले. म्हणून वडार समाजाच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचा विचार करताना त्यांच्या श्रमाच्या इतिहासाबरोबरच त्यांच्या सामाजिक इतिहासाचाही विचार करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतरचा प्रश्न : राष्ट्र उभे करणाऱ्यांचे जीवन कसे उभे करणार? स्वातंत्र्यानंतर भारताने धरणे, रस्ते, रेल्वे, कारखाने, शहरे आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्याचा मोठा प्रवास केला. या विकासामध्ये श्रमिक समाजांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला. मात्र विकासाची पायाभरणी करणाऱ्या अनेक कुटुंबांना स्वतःच्या जीवनात स्थैर्य, शिक्षण, आरोग्य, जमीन, निवारा आणि सामाजिक सुरक्षा मिळाली का, हा प्रश्न आजही महत्त्वाचा आहे. वडार समाजाच्या संदर्भात म्हणूनच 'राष्ट्रनिर्मितीतील योगदान' हा विषय केवळ गौरवाचा विषय न राहता सामाजिक न्यायाचा प्रश्न बनतो. ज्यांनी इतरांसाठी घरे, रस्ते आणि पायाभूत सुविधा उभारल्या, त्यांच्या पुढच्या पिढ्यांना शिक्षणाची आणि स्थिर उपजीविकेची संधी मिळणे ही राष्ट्रनिर्मितीचीच पुढची पायरी आहे. पारंपरिक कौशल्याचे आधुनिक रूपांतर आजच्या काळात वडार समाजातील पारंपरिक कौशल्यांचे आधुनिक अर्थव्यवस्थेत रूपांतर करण्याची गरज आहे. दगडकाम, बांधकाम, स्थापत्याशी संबंधित कौशल्य, रस्ते बांधणी, जलसंधारण आणि इतर तांत्रिक क्षेत्रांमध्ये कौशल्यविकासाच्या माध्यमातून नव्या संधी निर्माण करता येऊ शकतात. यासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नाही. कौशल्य प्रशिक्षण, औपचारिक प्रमाणपत्रे, आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, बाजारपेठेपर्यंत पोहोच, सुरक्षित रोजगार आणि मुलांसाठी दर्जेदार शिक्षण या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घ्याव्या लागतील. इतिहासाचे पुनर्लेखन नव्हे, इतिहासाचे पूर्णत्व वडार समाजाच्या योगदानाची चर्चा करताना कोणत्याही राजे, वास्तुविशारद किंवा इतर समुदायांचे योगदान कमी करण्याचा हेतू नसावा. उलट इतिहास अधिक पूर्ण करण्याचा हा प्रयत्न असावा. किल्ला म्हणजे केवळ राजा नाही. रस्ता म्हणजे केवळ शासन नाही. विहीर म्हणजे केवळ गाव नाही. इमारत म्हणजे केवळ वास्तुविशारद नाही. या सर्वांच्या मागे असंख्य हात असतात. त्या हातांना इतिहासात नाव मिळाले किंवा नाही, तरी त्यांच्या श्रमाशिवाय राष्ट्राची भौतिक उभारणी शक्य झाली नसती. थोडक्यात वडार समाजाच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाकडे पाहण्याची वेळ आता आली आहे. दगड, माती, पाणी आणि रस्ते यांच्याशी जोडलेल्या त्यांच्या पारंपरिक श्रमकौशल्याने भारताच्या भौतिक विकासात विविध काळात योगदान दिले. मात्र या योगदानाची पुरेशी नोंद सामाजिक स्मृती आणि मुख्य प्रवाहातील इतिहासात झालेली नाही. म्हणून वडार समाजाच्या इतिहासाचा अभ्यास केवळ एका समाजाच्या गौरवासाठी नव्हे, तर भारताच्या श्रमाधारित राष्ट्रनिर्मितीचा इतिहास अधिक समावेशक करण्यासाठी आवश्यक आहे. राष्ट्र केवळ संसदेत, राजवाड्यात किंवा युद्धभूमीवर घडत नाही. राष्ट्र रस्त्यावर घडते, विहिरीच्या काठावर घडते, बांधकामाच्या ठिकाणी घडते आणि दगडावर घाव घालणाऱ्या हातांतही घडते. त्या हातांची इतिहासात नोंद होणे, ही केवळ वडार समाजाची मागणी नाही; ती भारतीय राष्ट्रनिर्मितीच्या इतिहासाला पूर्णत्व देण्याची गरज आहे.


**लेखक : डॉ. विनायक मीराबाई सुभाष लष्कर, सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख,समाजशास्त्र विभाग तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती.**

**संपर्क क्रमांक : ८८०६८०६३६२**






**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.